जा.क्र.: ना जि सु र मं / अध्यक्ष / वि. भ. २०१९ / १६३७
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक.
१ला मजला, झंन्कार हॉटेल गंजमाळ बस स्टॉप,
कामगार न्यायालयाजवळ, नाशिक ४२२ ००१.
दुरभाष क्र : (०२५३) २५९००३१.
दिनांक : १३ ऑगस्ट २०१९

# आदेश

**विषय : सुरक्षा रक्षक मंडळातील सुट प्राप्त नोंदीत सुरक्षा रक्षक / सुरक्षा अधिकारी यांचे विषेश भत्ता / महागाई भत्त्यामध्ये दि. २४/०७/२०१९ पासून करण्यात येणारी सुधारणा.**

**संदर्भ :** कामगार उप आयुक्त, (ग्रा.वि.) मुंबई यांचे पत्र क्र.ग्रा.वि./ किवेअ/ वि.भ. /२०१९-२/कार्या-१० दि. ०५.०८.२०१९ रोजीचे

नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्याचे अधिकार "**महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) २००२ मधील खंड ३० मध्ये**" नमूद करण्यात आलेले आहेत. त्यानुसार मंडळातील सुरक्षा रक्षकांच्या वेतनासाठी किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत "**दुकाने व व्यापारी आस्थापना**" या रोजगारासाठी पुर्ननिर्धारित करण्यात आलेले किमान वेतनाचे दर आधारभूत प्रमाण मानून मंडळाने यापूर्वी मान्य केलेले आहेत. त्यानुसार उक्त अनुसुचित उद्योगधंद्यासाठी शासनाने वेळोवेळी जाहीर केलेला विषेश भत्ता मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना वेळोवेळी लागू करण्यात येत आहे.

कामगार उप आयुक्त, (ग्रा.वि.) मुंबई यांचे पत्र क्र.ग्रा.वि./किवेअ/वि.भ./२०१९-२/कार्या-१० दि.०५.०८.२०१९ रोजीचे अन्वये विविध अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता दि.०१.०७.२०१९ ते दि. ३१.१२.२०१९ या कालावधीकरिता विशेष भत्त्याचे दर जाहीर करण्यात आलेले आहेत. त्यानुसार "**दुकाने व व्यापारी आस्थापना**" या अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता **दि.२४.०७.२०१९ ते ३१.१२.२०१९** या कालावधीकरिता जाहीर करण्यात आलेले विशेष भत्त्याचे दर नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक या मंडळाच्या नोंदणीकृत सुरक्षा रक्षक/ मुख्य सुरक्षा रक्षक /सुरक्षा पर्यवेक्षक यांना लागू राहतील.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांना दि. २४ जूलै २०१९ पासून ते ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत सुधारीत महागाई भत्त्यासह लागू करण्यात आलेले वेतन व भत्ते**

| अ. क्र. | पद | मुळवेतन | विषेश भत्ता / महागाई भत्ता | घरभाडे भत्ता (३+४) ५% | प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | शैक्षणीक भत्ता | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | सुरक्षा पर्यवेक्षक | ११६३२ | ३९० | ६०१ | १३०० | २९४ | ३०० | १४५१७ |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १०८५६ | ३९० | ५६२ | १३०० | २९४ | ३०० | १३७०२ |
| ३ | सुरक्षा रक्षक | १००२१ | ३९० | ५२१ | १३०० | २९४ | ३०० | १२८२६ |

* किमान वेतन = मुळवेतन + विषेश भत्ता / महागाई भत्ता

सुट प्राप्त एजन्सी मालकांनी सुरक्षा रक्षक /सुरक्षा पर्यवेक्षक/ सुरक्षा अधिकारी यांना पुढील प्रमाणे इतर फायदे / लाभ देणे बंधन कारक आहे.

Bombay Intelligence Security (I) Ltd. NASIK

..२..

**१) सानुग्रह अनुदान :** किमान वेतनाच्या १०% **२) उपदान :** किमान वेतनाच्या ४ % **३) भरपगारी रजा :** किमान वेतनाच्या ६ % **४) भरपगारी सुट्टी :** किमान वेतनाच्या १ %.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक/ सुरक्षा अधिकारी यांच्या किमान वेतनावरील ३% लेव्ही दरमहा ५ तारखेपर्यंत मंडळात आर.टी.जी.एस. / DD द्वारे/ धनादेशा द्वारे जमा करणे बंधन कारक आहे. सबब, मंडळातील सर्व नोंदीत सुट प्राप्त एजन्सी मालकांना या द्वारे असे सुचित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांना दि. २४/०७/२०१९ पासून ते दि. ३१/१२/२०१९ पर्यंत सुधारीत वाढीव वेतनासह व विषेश भत्ता / महागाई भत्त्याच्या फरकासह रक्कम विनाविलंब सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक/ सुरक्षा अधिकारी यांना अदा करावी. तसेच सुधारीत वेतनाबाबत प्रशासकीय लेव्हीच्या फरकाची रक्कम मंडळाकडे विनाविलंब जमा करावी.**

सहाय्यक कामगार आयुक्त व अध्यक्ष
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ,
नाशिक.

प्रति,
व्यवस्थापक,
बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी
इ. मि. नेहरूनगर, नाशिकरोड
नाशिक.